# Rajarshi Shahu Mahavidyalaya (Autonomous), Latur

**Academic Year : 2018-19**

**Activities Report of Department of Maarathi**

**Activity No-8**

| Particulars | Details |
|---|---|
| Name of activity | **लेखन कार्यशाळा : कथा, कविता व वैचारिक लेखन** |
| Beneficiaries of activity | UG Students |
| Dates ( From –To ) | 26.01. 2019 |
| No of participants | 348 + 4 Staff |
| Details of Activity | <br><br>लेखन कार्यशाळेत उद्घाटकीय मार्गदर्शन करताना पर्यावरण तज्ज्ञ मा. अतुल देऊळगावकर. मंचावर उपप्राचार्य डॉ. ई. यू . मासूमदार, अंनिस चे राज्य प्रधान सचिव माधव बावगे , उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, कथाकार विलास सिंदगीकर, डॉ. संभाजी पाटील आदी |

| Details of Activity | |
|---|---|




लेखन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ग्रामीण कथाकार विलास सिंदगीकर




लेखन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना कवी, कादंबरीकार बालाजी मदन इंगळे.




लेखन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. जयद्रथ जाधव



लेखन कार्यशाळेतील उपस्थित विद्यार्थी

| | |
|---|---|
| Outcomes :- | -सर्जनशील साहित्याची निर्मितीप्रक्रिया समजून घेता आली.<br>-कथा- लेखन आणि सादरीकरण आणि अनुभवाची शब्दरूपे समजण्यास मदत झाली.<br>-कविता-लेखन प्रक्रिया आणि निर्मितीचे टप्पे ,त्यातील मुल्यात्मकता समजून घेता आली.<br>-सर्जनशील साहित्य लेखन विकसित होण्यास मदत झाली. |



# लेखनाला वास्तवाची जोड द्या

## बालाजी इंगळे यांचे आवाहन; नवोदितांसाठी एकदिवसीय लेखन कार्यशाळा

लातूर, ता. २९ : नव्याने लिहू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी, नवोदित लेखकांनी लेखन ही बाब गांभीर्याने घ्यावी. समाजातील समस्या, आपल्या आजूबाजूच्या वातावरणाबाबत आपल्या संवेदना सतत जागरूक ठेवा. आपल्या लेखनाला वास्तवाची जोड असावी, असे मत बोलीभाषेचे अभ्यासक बालाजी मदन इंगळे यांनी मंगळवारी येथे केले.

राजर्षी शाहू महाविद्यालयात मराठी भाषा वाङ्मय मंडळ आणि महाराष्ट्र विवेक वाहिनीच्या वतीने एकदिवसीय लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. याचे उद्घाटन पर्यावरणाचे अभ्यासक अतुल देऊळगावकर यांच्या हस्ते झाले. या वेळी इंगळे, ग्रामीण कथाकार विलास सिंदगीकर, अंनिसचे प्रधान सचिव माधव बावगे, मसापच्या शहर शाखेचे अध्यक्ष डॉ. जयद्रथ जाधव, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ई. यू. मासूमदार, उपप्राचार्य विलास कांबळे, मराठी विभागप्रमुख डॉ. संभाजी पाटील उपस्थित होते.

देऊळगावकर म्हणाले, आजच्या तरुण पिढीसमोर सर्वांत मोठे आव्हान म्हणजे, स्वतःला सोशल मीडियाच्या जाळ्यातून सोडविणे हे आहे. यावर तरुणांनी जरूर विचार करावा. सिंदगीकर म्हणाले, भावनांची तीव्र अभिव्यक्ती म्हणजे साहित्य असते. शालेय- महाविद्यालयीन वयात खूप कवी तयार होतात. लेखन ही एक भावनिक गरज आहे. ही कला तुम्ही जरूर जोपासावी. या वेळी गांधी विचार संस्कार परीक्षामध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सूरज कांबळे, नुजहत शेख यांनी सूत्रसंचालन केले. विक्रांत शंके यांनी आभार मानले. कविसंमेलनाने कार्यशाळेची सांगता झाली.

दैनिक सकाळ : दि. २९. ०१. २०१९- कार्यशाळेची बातमी